GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD

MARATHI TERMINAL EXAMINATION 2025-2026

**SUBJECT – MARATHI**

DATE - 25 SEPTEMBER 2025 CLASS – 9TH A/B/C.

DAY – THURSDAY DURATION- 2 &1/2 MARKS – 80

---

**INSTRUCTIONS :-** **1.This paper comprises of two sections. Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet**

---

**विभाग (अ)** [गुण-४०]

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

मैत्रीचा मंत्र सांगणा-या या ऑलिपिक सामन्यांची त्यानंतर इ. स. १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. त्या वर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक कॉंग्रेस भरवण्यात आली होती. त्या कॉंग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या कॉंग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले. शरीरसंपदा वाढवण्यासाठी, बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरवाव्यात असे ठरले. १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशात भरवले जातात. त्या निमित्ताने जगात सद्भावना, समता, मैत्री, विश्वबंधुत्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

या सामन्यांत निरनिराळ्या एकवीस खेळांची तरतूद आहे. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात. या सामन्याच्या व्यवस्थेसाठी एक आंतरराष्ट्रीय ऑलिपिक समिती नेमलेली असते. या स्पर्धात भाग घेणाऱ्या प्रत्येक देशाचे एक ते तीन प्रतिनिधी या समितीत असतात. या समितीमध्ये खेळांची व्यवस्था त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघाकडे असते. ऑलिपिक सामन्यांसाठी लागणारा खर्च फारच मोठा असतो. हा सर्व पैसा स्पर्धक देश उभा करतात

क्रीडेच्या क्षेत्रात जातिभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. येथे सर्वांना समान संधी मिळते. अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने आफ्रिकी खेळाडू.

१९३६ मध्ये बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत त्याने चार अजिक्यपदे मिळवली. इतकेच नव्हे, तर त्या चारही बाबतींत त्याने नचे उच्चांक प्रस्थापित केले.

अमेरिकेच्या यशाचा तो मोठा शिल्पकार ठरला. अमेरिकेनेच नव्हे, तर साऱ्या जगाने या खेळाडूचा त्यावेळी केवढा गौरव केला! केवढे कौतुक केले! ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून साऱ्या जगाने त्याची प्रशंसा केली.

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू. १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले. ५००० मीटर धावणे व मॅरेथोन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडविला. " जगातील एक मानवी रेल्वे इंजिन " अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेकबद्दल तर अभिमान वाटलाच पण त्याबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्दलही त्याच्या मनात आदर निर्माण झाला.

**कृती १. कंसातील शब्दांचा वापर करून खालील प्रश्नाचे उत्तर लिहा: गुण २**

(सदभावना, बेशिस्त, समता, मैत्री, राग, विश्वबंधुत्व, शिस्त, वाद, ऐक्य )

| |
|---|
| अ. ऑलिंपिक सामन्याच्या निमित्ताने वाढीस लागणाऱ्या भावना . |

**कृती २ : योग्य जोड्या जुळवा : गुण २**

| अ. क्र | अ गट | ब गट |
|---|---|---|
| १. | सामन्यांची व्यवस्था | स्पर्धक देश |
| २. | प्रत्येक देशाचे प्रतिनिधी | आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती |
| ३. | खेळाची व्यवस्था | एक ते तीन |
| ४. | सामन्यासाठी लागणारा खर्च | आंतरराष्ट्रीय संघ |

**कृती ३ : खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : गुण ५**

१. ऑलिंपिक सामन्याचा मंत्र कोणता ?

२. ऑलिंपिक सामन्यात किती खेळांची तरतूद आहे ?

३.अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने कोणता खेळाडू होता ?

४ ऑलिंपिक कॉंग्रसमध्ये कोणत्या फ्रेंच क्रीडातज्ञाने ऑलिंपिक सामन्याचे पुनरुज्जीवन केले ?

५. अमेरिकेतील जेसी ओवेन्स याने बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत किती अजिंक्यपदे

मिळवली ?

**कृती ४. खालील प्रश्नाचे उत्तर तीन ते चार वाक्यात लिहा: गुण ३**

१. एमिल झेटोपेक या खेळाडूविषयी माहिती लिहा ?

**प्रश्न २.खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : (कोणतेही ५) गुण ५**

१. एडीसनने कोणत्या धातूचा महत्वपूर्ण शोध लावला ?

२. कवयित्रीच्या मते , दाही दिशांना रंग का उधळले आहेत?

३. एडीसनच्या व्यक्तिमत्वाचे गुणविशेष कोणते होते ?

४. लेखकाचे स्काउट मास्तर कोण होते ?

५. लिंबोणीच्या झाडाचे आगमन कसे झाले?

६. सुर्यग्रहणाचा अभ्यास करण्यासाठी कोण कोण जमले होते?

७. आंब्याच्या मोहरातून कोणाची सुरेल तान येते?

८. कोणत्या दोन खंडात बांबूच्या असंख्य जाती सापडतात ?

**प्रश्न ३.खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा. गुण ५**

१. ग्रंथालय प्रमुख( Head of Library) या नात्याने शाळेत( In your school ) पुस्तकांची मागणी ( DEMAND FOR Books ) करणारे पत्र मा. व्यवस्थापक ,

आदर्श बुक डेपो , मुंबई -४०० ००३६ , यांना लिहा.

OR

२. दिवाळीच्या सुट्टीत ( In Diwali vacation ) तुमच्या घरी ( At your home ) आमंत्रण ( To invite ) करणारे पत्र तुमच्या मित्राला/मैत्रिणीला ( To your friend) लिहा :

**प्रश्न ४. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

रयतेचा राजा

आपल्या देशात पूर्वी एक महापराक्रमी राजा होऊन गेला. त्यांचे नाव शिवाजी.शिवाजीच्या आईचे नाव जिजावाई आणि वडिलाचे नाव शहाजीराजे भोसले शहाजीराजे मोठे सरदार होते ते विजापूरला राहत असत. जिजाबाईचा स्वभाव फार प्रेमळ होता. त्या फार हुशार आणि गुणवती होत्या. त्यानी शिवबाला लिहायला, वाचायला शिकवले. रामायण, महाभारतातल्या खूप गोष्टी सांगितल्या. तसेच कधी नामदेवांचे. कधी ज्ञानेश्वरांचे तर कधी एकनाथांचे अभंग म्हणून दाखवत असत. रामायण, महाभारतातील शूर पुरुषांच्या गोष्टी शिवबांना फार आवडत. अशा अनेक गोष्टी जिजाबाईनी शिवबाला लहानपणी शिकवल्या.

शिवबांना वाटे आपणही भीमासारखे व रामासारखे शूर व्हावे. खूप पराक्रम करावा. रामासारखे राज्य करावे. लहानपणापासूनच शिवबा खूप चपळ आणि हुशार होते. सर्व खेळात पटाईत होते. त्याचे खूप सवंगडी होते. त्यांना ते मावळे म्हणत असत. गरीब मावळ्यांची मुले शिवरायांबरोबर खेळायला येत. कधीकधी शिवबाही त्यांच्या झोपडीत जात. त्यांची कांदाभाकर आवडीने खात. त्यांच्याशी गमतीदार खेळ खेळत. कधी घोड्यावर वसावे नि रानोमाळ दौडावे कधी शिकार करावी. मातीचे किल्ले बनवावेत आणि लुटुपुटुची लढाई करून एखादा किल्ला सर करावा. अशा अनेक गोष्टी शिवबा लहानपणी आपल्या सवंगड्यासोबत करत असे. मग त्या किल्ल्यावर शिवबांचे राज्य ! जिजाबाईंनाही याचे फार कौतुक वाटे.

जिजाबाईंनाही वाटे आपला मुलगा राजा व्हावा. त्याने आपल्या देशाला आणि प्रजेला गुलामगिरीतून सोडवावे. आपले स्वतंत्र राज्य निर्माण करावे त्या शिवबाला म्हणत, "शिवबा तुम्ही शूर झाले पाहिजे" शिवराय नेहमी मातेच्या आज्ञेत वागले. त्यांच्या इच्छा शिवबानी नेहमी पूर्ण केल्या. जिजाबाई व शहाजीराजे या थोर माता-पित्याचे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ शिवरायांनी पूर्ण केले. हिंदवी स्वराज्य हे शिवरायांचे स्वप्न होते. हिंदवी म्हणजे हिंदुस्थानात राहणारे. मग ते कोणत्याही धर्माचे असोत, कोणत्याही जातीचे असोत. त्याचे राज्य ते हिंदवी स्वराज्य. हेच शिवबा पुढे महाराष्ट्रातील रयतेचे लाडके राजे झाले.

**कृती१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा** [Answer the following questions] **गुण ४**

१ शिवाजींच्या आईचे नाव काय होते?

२. जिजावाईचा स्वभाव कसा होता ?

३. शहाजीराजे हे कोण होते?

४. शिवरायांचे स्वप्न कोणते होते?

**कृती २. रिकाम्या जागी पाठातील योग्य शब्द लिहा. गुण २**

१. हेच शिववा पुढे महाराष्ट्रातील ------------------------ लाडके राजे झाले.

२. मग त्या किल्ल्यावर ------------------------------ राज्य !

३. जिजाबाई व शहाजीराजे या थोर माता-पित्याचे -------------------- स्वराज्याचे मनोरथ शिवरायांनी पूर्ण केले.

४. त्या फार हुशार आणि ------------------------------- होत्या.

**कृती ३. खालील प्रश्नांची उत्तरे तीन ते चार ओळीत लिहा : गुण ४**

१. जिजाबाईनी शिवबाला लहानपणी कोणकोणत्या गोष्टी शिकविल्या?

२. शिवबा लहानपणापासून आपल्या सवंगड्यासोबत कोणकोणत्या गोष्टी करत असत?

**प्रश्न ५. खालीलपैकी कोणत्यही एका ( ANY 1 ) विषयावर निबंध लिहा : गुण ८**

१. माझा आवडता सण ( My favourite festival )

( मुद्दे : सण म्हणजे काय – तुमचा आवडता सण कोणता – तो सण तुम्हाला का आवडतो ? – नवीन कपडे – खाद्यपदार्थ – मजाच मजा )

२. पुस्तक वाचनाचे महत्व ( Importance of reading books )

( मुद्दे: आपले जीवन सुंदर आहे – जीवनाचा अर्थ काय आहे– जीवनात खेळाचे महत्व – तसेच वाचनाचे महत्व – पुस्तक आपल्याला काय काय देतात – आपण मोठी माणसे बनतो – आपल्या जीवनात आनंद मिळतो )

३. माझे आवडते शिक्षक ( My favourite teacher )

( मुद्दे : आई वडील आपले पहिले शिक्षक – शिक्षकाची आपल्या जीवनात काय भूमिका आहे- तुमचे आवडते शिक्षक कोण आहेत – तुम्हाला ते का आवडतात – तुमच्या जीवनात त्यांचे काय स्थान आहे ?)

**GREEN LAWNS HIGH SCHOOL, WARDEN ROAD**

**MARATHI TERMINAL EXAMINATION 2025-2026**

**SUBJECT – MARATHI SECTION (B)**

**DATE - 25 SEPTEMBER 2025 CLASS – 9TH A/B/C.**

**NAME: ---------------------------- DIV: --------- ROLL NO: ------**

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

---

**विभाग (ब) गुण ४०**

**प्रश्न १. (अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :** **गुण ५.**

१. प्लेटीनमचा प्रयोग ---------------------- होता.

( स्वस्त , महागडा , भारी )

२. श्री. नाईक मला चौथीत इंग्रजी आणि ----------------------- शिकवत.

( इतिहास , भूगोल , गणित )

३ -------------------------या दिवशी एडीसनच्या घराभोवती आकर्षक रोषणाई होती.

( २१ ऑक्टोबर १८८९ , २१ ऑक्टोबर १८९० , २१ ऑक्टोबर १८७९ )

४. दिव्याच्या शोधाच्या ------------------------- महोत्सवाच्या निमित्ताने अमेरिकेने हा दिवस महोत्सवासारखा साजरा केला. ( अमृत , सुवर्ण , सोन्यासारखा )

५. ध्वजाशेजारी क्षुद्र विचारांचा अंधकार घालवणारी ----------------------- तेवत असते.

( मशाल , ज्योत , समयी )

**प्रश्न १. (ब) . खालील शब्दांचे अर्थ लिहा :** **गुण ४**

( गवती पठार , निष्कर्ष , मृदू , अग्निपरीक्षा , अग्नीपारीषा, ओळख , भाकास, भकास , तेजस्वी , जिद्द , तेजस्वि , जीद्द , गविती पठार , म्रुदु , )

१. दिव्य : --------------------- २. मुलायम : --------------------------

३. परिचय : -------------------- ४. उजाड : ---------------------------

५. अनुमान : ------------------- ६. माळरान : ------------------------

७. प्रखर : ---------------------- ८. उमेद : -----------------------

**प्रश्न १. (क) वाक्प्रचार व अर्थ लिहा :** **गुण ५**

( वचक असणे , वेळ मिळणे , योग्य सल्ला देणे , टिपण ठेवणे , विजय मिळविणे , वाचक असणे , टिपन ठेवणे , वीजय मिळविणे )

१. फुरसत मिळणे : ------------------------------------------------

२. समुपदेशन करणे : ------------------------------------------------

३. मात करणे : ------------------------------------------------

४. दरारा असणे : ------------------------------------------------

५. नोंद ठेवणे : ------------------------------------------------

**प्रश्न १. (ड) खालील शब्दांपासून वाक्ये तयार करा :** **गुण ४**

**(MAKE MEANINGFUL SENTENCES )**

१. हिंस्र ( WILD ) : ------------------------------------------------

२. सुरेल ( MELODIOUS ) : ------------------------------------------------

३. उमेद ( HOPE ) : ------------------------------------------------

४. नजराणा ( GIFT ) : ------------------------------------------------

**प्रश्न २. (अ) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा :** **गुण ४**

१. समाजात प्रत्येक माणसाची इभ्रत असते .

उत्तर: ------------------------------------------------

२. काझीरंगा मध्ये खूप कर्दम आहे.

उत्तर : ------------------------------------------------

३. आज पाउस पडेल असा मी तर्क केला

उत्तर : ------------------------------------------------

४. राणीच्या बागेत विविध पक्षी वावरत असतात.

उत्तर : ------------------------------------------------

**प्रश्न २. (ब) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा :** **गुण ४**

१. तलावामध्ये आम्ही एक छोटा मासा बघितला.

उत्तर : ------------------------------------------------

२. प्रत्येक वस्तू <u>टाकाऊ</u> असतेच असे नाही.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

३. काही काही ठिकाणी रेल्वेतून प्रवास करताना <u>सोय</u> होत असते.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

४. जंगलात फिरताना मी <u>प्रत्यक्ष</u> वाघाला बघितले.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

**प्रश्न २. (क) खालील दिलेल्या अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा :** **गुण ४**

१. भारत भूमीवर एक <u>योद्धा</u> आपल्या रक्षणासाठी लढा देत आहे.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

२. आजीने मला अनेक <u>गोष्टी</u> सांगितल्या.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

३. आमच्या शाळेच्या बाजूला एक <u>कचेरी</u> आहे.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

४. वाघाला बघितल्यावर मी <u>किंकाळी</u> फोडली.

उत्तर : ------------------------------------------------------------------------

**प्रश्न ३. (अ) खालील वाक्यातील नाम व प्रकार ओळखा :** **गुण २**

१. हिमालय हा उंच पर्वत आहे.

उत्तर: नाम : --------------------- प्रकार : ----------------------

२. त्याला खूप आनंद झाला.

उत्तर: नाम : ---------------------- प्रकार : ------------------------

**प्रश्न३. (ब) खालील वाक्यातील विशेषण व प्रकार ओळखा:** **गुण २**

१. एडीसन जन्मतः हुशार नव्हते .

उत्तर: विशेषण : ------------------ प्रकार : ------------------------

२. त्या झाडाखाली मुले खेळत होती.

उत्तर: विशेषण : ---------------------- प्रकार : ------------------------

(8A)

**प्रश्न ४. (अ) . खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची नावे मराठीत लिहा:** **गुण २**

१. ( ! ) : ----------------------------------------------------------------

२. ( , ) : ----------------------------------------------------------------

३. ( : ) : ----------------------------------------------------------------

४. ( ? ) : ----------------------------------------------------------------

**प्रश्न ४. (ब) खालील वाक्याचे प्रकार ओळखा :** **गुण २**

( विधानार्थी , प्रश्नार्थी , आज्ञार्थी , उद्गारार्थी )

१. विक्रम साराभाई खूप बुद्धिमान होते.

उत्तर : ---------------------------------------------------------

२. " सामान बरोबर आहे का ते बघा "

उत्तर : ---------------------------------------------------------

३. वाहवा , काय सुंदर देखावा आहे हा!

उत्तर : ---------------------------------------------------------

४. तुमचे पैसे मी कसे देऊ ?

उत्तर : ---------------------------------------------------------

**प्रश्न ४. (क) . अचूक शब्द ओळखा:** **गुण २**

**( FIND OUT THE CORRECT WORD )**

**१. चिकाटी , चीकाती , चिकटी , चीकाटी :** ---------------------------------------------

**२. काल्पना , कल्पाना, कलपना, कल्पना :** ---------------------------------------------

---------------------------**THE END**---------------------------